दै. गोदातीर दि. 2.03.25

# ६ लाख ३५ हजारांच्या मुद्देमालासह गुटखा जप्त; कुंडलवाडी पोलिसांची कारवाई

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनिवार, दि. १ मार्च रोजी दुपारी १२.३० वाजे सुमारास कुंडलवाडी येथील चुंगी नाका येथे बिलोली येथून एका लाल रंगाच्या स्वीफ्ट कारमध्ये गुटखा येत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्या-वरून सदरील गुटखा व कार जप्त केली. तसेच बिलोली शहरातील अब्दुल फिरोज अब्दुल वाहब यांच्या मालकीच्या गोडाऊनमधून गुटखा जप्त केला.

शनिवार, दिनांक १ मार्च रोजी १२.३० वाजताचे सुमारास कुंडलवाडी शहरात बिलोली येथून एका लाल रंगाच्या स्वीफ्ट कारमध्ये गुटखा येत आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून कुंडलवाडी स्टेशन येथील एपीआय शिंदे व त्यांचे कर्मचारी सदर ठिकाणी स्टाफसह जाऊन सदरची स्वीफ्ट कार व गुटखा ताब्यात घेतला. तसेच नमूद कारचा चालक यास गुटखा कोठून आणलेला आहे याबाबत विचारपूस केली असता सदरचा गुटखा माल हा त्याने बिलोली येथील अब्दुल फिरोज अब्दुल वाहिब गुटखा व्यापाऱ्याकडून खरेदी केलेला आहे असे सांगितल्यानंतर पोलीस स्टेशनच्या स्टाफसह सदर कार चालकास ताब्यात घेऊन बिलोली येथील इनामदार गल्लीतील गुटखा व्यापारी फिरोज याच्या घराजवळील पडक्या घरातून गुटख्याचा मुद्देमाल मिळून आला आहे. सदरचा मुद्देमाल ताब्यात घेऊन कुंडलवाडी येथे आणला व मुद्देमालाची मोजणी केली असता स्वीफ्ट कार क्रमांक एम एच ५ एजे ८०९६ किंमत ३ लाख रुपये तसेच आरोपीचे वाजिद मंजूर अहमद यांच्या ताब्यातील मोबाईल १० हजार रुपये व गुटख्याचा मुद्देमाल असा एकूण ६ लाख ३५ हजार ७१० रुपयांचा गुटख्याचा मुद्देमाल कार व मोबाईल असे जप्त करण्यात आला आहे.



या प्रकरणातील आरोपी शेख वाजिद शेख मंजूर अहमद वय ३६ राहणार कुंठा गल्ली धर्माबाद याला ताब्यात घेण्यात आले असून, पाहिजे आरोपीचा शोध सुरू आहे. सदर कारवाईबाबत पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद अधिकारी अमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सदरील कार्यवाही पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्यानुसार ज्ञानेश्वर शिंदे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुंडलवाडी यांना शनिवार, दि. १ मार्च रोजी पोलीस स्टेशनला हजर असताना गुप्त माहिती मार्फत माहिती मिळाली होती. पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराया धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोहे का माधव पाटील ,पो का रामेश्वर पाटील, रघुवीर सिंग चव्हाण, होमगार्ड अंकुश इरेवाड, इस्माईल पठाण, महेश आदमकर, आकाश गायकवाड ज्ञानेश्वर रामपुरे, शेख गौस लिंगुराम गुरुपवार ,सुप्रिया बोलचटवार यांनी सदर कारवाईत सहभाग घेतला होता.

दै. देशोन्नती दि. 02.03.25



# कुंडलवाडी-बिलोली रस्त्यावर गुटख्यासह ६ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**कुंडलवाडी** : बिलोली-कुंडलवाडी रस्त्यावरून एका लाल रंगाच्या कारमध्ये गुटखा येत असल्याची माहिती कुंडलवाडी पोलिसांना खबऱ्यामार्फत मिळाली. पोलिसांनी सापळा रचून शनिवारी दुपारी१२.३० वाजता छापा टाकून गुटख्यासह ६ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुंडलवाडी शहरात बिलोली येथून एका लाल रंगाच्या स्वीफ्ट कारमध्ये गुटखा येत असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्यामार्फत शनिवारी मिळाली. सपोनि ज्ञानेश्वरशिंदेयांनीकर्मचाऱ्यांसहरस्त्यावर सापळा रचला. कार क्रमांक एम.एच.०५-ए.जे.८०९६ आली असताना पोलिसांनी गाडी अडवून कारचालक शेख वाजिद शेख

- कुंडलवाडी पोलिसांची कारवाई
- गुप्त खबऱ्यामार्फत मिळाली होती माहिती

मंजूर अहेमद(३६) रा. गुंठा गल्ली, धर्माबाद याची कसून चौकशी केली असता कारमध्ये गुटख्याचा साठा आढळून आला. पोलिसांनी तो जप्त करून हा गुटखा कोठून आणला, याची चौकशी केली असता हा गुटखा बिलोली येथील व्यापारी फेरोज अब्दुल वाहाब रा. इनामदार गल्ली, बिलोली याच्यांकडून आणल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी ३ लाख किंमतीची कार व गुटख्यासह एकुण ६ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत सपोनि ज्ञानेश्वर शिंदे, पोलिस जमादार माधव पाटील, पोलिस कर्मचारी रामेश्वर पाटील, रघुवीरसिंह चव्हाण, अंकुश इरेवार, इस्माईल पठाण, महेश आदमकर, आकाश गायकवाड, ज्ञानेश्वर रामपूरे, शेख गौस, लिंगूराम गुरूपवार, सुप्रिया बोलचटवार आदींचा सहभाग होता.